# मुकूल माधव फांऊडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना मुक्ताई पुरस्कार प्रदान



पुणे ८ जून २०१३: अध्यात्म व संतांनी निर्माण केलेली परंपरा हा खरा ठेवा आहे. संतांच्या नितीमूल्यांचे शिक्षण शाळांमधून दिले पाहिजे, असे प्रतिपादन माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी केले.

पुण्यातील शनिवारवाडा येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आदिशक्ती मुक्ताई स्मृतीगौरव व ज्ञानदा स्मृतीगौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्थेचे सोपानकाका वाल्हेकर महाराज, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ देवीसिंह शेखावत, जळगाव येथील मुक्ताई संस्थानाचे ॲड. रवींद्र पाटील, अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, वा.ना. उत्पात आदी उपस्थित होते.

आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्था मुंबई व श्री संत आदिशक्ती मुक्ताई विश्वकल्याण फांऊडेशनच्या वतीने २१ वर्षापासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या उपेक्षित लोकांच्या कल्याणाकरिता नि:स्वार्थीपणे योगदान करणाऱ्या संस्था व व्यक्तींना मुक्ताई पुरस्कार दिला जातो. शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या मुकूल माधव फाऊंडेशनने अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांच्या ह्या विविध क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल मुकुल माधव फांऊडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांना सामाजिक व धार्मिक कार्यासाठी मुक्ताई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते संस्थेच्या सदस्य मीना डिसा यांनी हा पुरस्कार स्विकारला.

यावेळी आमदार शोभा फडणवीस, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे. साईबाबा ट्रस्ट प्रतिशिर्डी शिरगावचे अध्यक्ष प्रकाश देवळे, धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने गौरविण्यात आले.मुकुल माधव फांऊडेशन (एमएमएफ) ही सार्वजनिक संस्था १९९९ मध्ये स्थापन झाली आहे. या संस्थेतंर्गत आरोग्य, शिक्षण व सामाजिक उपक्रम राबविले जातात. समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास व्यक्तींना मदत करणे, उपेक्षित वर्गाला धर्मादाय स्वरुपाच्या वैद्यकीय, इतर संस्था व अनाथालये, निराधार व अपंग मुलांच्या आश्रयगृहांना शैक्षणिक सहाय्य करणे, असे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

दिनानाथ मंगेशकर, केईएम, रुबी हॉल अशा पुण्यातील नामवंत रुग्णालयातील गरजू रुग्णांच्या उपचाराला विलंब होऊ नये तसेच उपचाराचा खर्च देऊ न शकणाऱ्या व दीर्घकाळ गरजेचे असलेल्या व आजाराच्या रुग्णांच्या उ जबाबदारी मुकुल माधव फ समर्थपणे सांभाळत आहे.

शैक्षणिक क्षेत्रामध रत्नागिरी व आसपासच्या ८ शाळा दत्तक घेतल्या अ शाळेतील शिक्षण सर्वसाधारण सुधारणा व्हा त्यांना पुस्तके, शालेय संगणक पुरविले जातात स्थापन केलेली मुकुल विद्यालय ही शाळा विभागातील गरीब वि अत्यल्प खर्चात शिक्षण आहे.

समाजाच्या गरज असतात आणि अर्थ व स्वरुपातील मदत योग्य त प्रभावी रितीने पोहो एमएमएफचा हेतू आहे.